# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

# कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 165 |
| स्थळ | : | प्रशासकीय इमारत<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422 222 |
| वार व दिनांक | : | शनिवार , दिनांक : 24 मार्च 2018 |
| वेळ | : | सकाळी 11.30 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

## कार्यवृत्त

165 वी, व्यवस्थापन मंडळ बैठक, शनिवार, दिनांक 24 मार्च 2018 रोजी सकाळी 11.30 वाजता, प्रशासकीय इमारत येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1.प्रा.ई वायुनंदन, कुलगुरु, — अध्यक्ष
2.मा.आमदार श्रीमती देवयानी फरांदे — सदस्य
3.मा.प्रा. कपिलकुमार, नवी दिल्ली — सदस्य
4. मा.डी.पी.नाठे सहसंचालक, तंत्रशिक्षण.नाशिक यांचे प्रतिनिधी — सदस्य
5.मा.संचालक,व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी — सदस्य
6.डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव — सचिव
7.मा.प्रभारी वित्त अधिकारी, य.च.म.मुक्त विद्यापीठ,नाशिक — निमंत्रित
8.परीक्षा नियंत्रक, य.च.म.मुक्त विद्यापीठ,नाशिक — निमंत्रित

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

9.मा.आ.श्री.हेमंत टकले, मुंबई — सदस्य
10. मा.आमदार श्री.बाळासाहेब सानप,नाशिक — सदस्य
11.मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण,मुंबई — सदस्य
12.मा. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
13. मा. सचिव, कृषी, मुंबई — सदस्य
14.मा.संचालक, उच्च शिक्षण,पुणे — सदस्य

| ठराव क्र. | | तपशील |
|---|---|---|
| 165.1.0 | 165.1.1 | स्वागत - बैठकीच्या सुरुवातीला कुलसचिव यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. |
| | 165.2.1 | दि. 7 सप्टेंबर 2017 रोजी झालेल्या 164 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून मा.कुलगुरु यांनी स्वाक्षरी करणे<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव**: दि. 7 सप्टेंबर 2017 रोजी झालेल्या 164 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्तांत वाचून कायम करुन त्यावर मा.कुलगुरु यांनी स्वाक्षरी केली |
| | 165.2.2 | दि. 7 सप्टेंबर 2017 रोजी झालेल्या 164 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव:** दि. 7 सप्टेंबर 2017 रोजी झालेल्या 164 व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| 165.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 165.3.1 वित्त | दि. 13 मार्च 2018 रोजी झालेल्या वित्त समिती बैठकीच्या कार्यवृत्तास मंजुरी देण्याची बाब विचारार्थ<br>वित्त समितीच्या दि. 13 मार्च 2018 रोजीच्या कार्यवृत्तास मंजुरीची बाबीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव:** वित्त समिती ठराव क्र. 11.3.1 ची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली .<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव:** वित्त समिती ठराव क्र. 11.3.2 नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली .<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव:** वित्त समिती ठराव क्र. 11.4.1 नोंद घेण्यात आली. तसेच |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यापीठाचे 2018-19 चे अंदाजपत्रक सादर करण्याकरिता तीन महिन्याचा कालावधी देण्यात आला. या कालावधीच्या खर्चाकरिता रु. 45 कोटी लेखा अनुदानास मान्यता देण्यात आली.अंदाजपत्रक तयार करण्याकरिता आंतरिक समिती तयार करून त्यात बाहेरील एक तज्ज्ञ सदस्य घेण्याचे निर्देश देण्यात आले. यास मान्यता देण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव:**वित्त समिती ठराव क्र.11.4.2ठरावाच्या अनुषंगाने 2009-10 ते 2013-14 पर्यंतचे लेखा परीक्षण अहवालास अद्याप वित्त समितीची मंजुरी न मिळाल्याबाबत खेद व्यक्त करण्यात आला.तसेच मा.सदस्य प्रा.डॉ.कपिलकुमार वआ.देवयानी फरांदे यांनी याबाबतीत तात्कालीन वित्त अधिकारी व लेखा अधिकारी यांचेकडून खुलासा मागविण्याचे निर्देश दिलेत.लेखा अधिका-यांना याबाबतीत 2009-10 ते 2013-14या आर्थिक वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालातील त्रुटींची पुर्तता केल्याशिवाय त्यांना सेवानिवृत्तीकरिता"ना हरकत प्रमाणपत्र"व सेवानिवृत्तीचे इतर लाभ न देण्याचे निर्देश दिलेत.यास मान्यता देण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.3 ची नोंद घेण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.4 ला मान्यता देण्यात आली <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.5 ला मान्यता देण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.6 नुसार विद्यापीठ परिसरात Wi-Fi Connectivity साठी रु.35 लाख किमतीचे हार्डवेअर व सॉफ्टवेअर खरेदीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली मात्र दोन ज्युनिअर टेक्निशिअन नेमण्यास मान्यता नाकारण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.7 ची नोंद घेण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.8 ची नोंद घेण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.9 ची नोंद घेण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.10 मान्यता देण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.12 मान्यता देण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.13 मान्यता देण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.14 मान्यता देण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.15 ची नोंद घेण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.16— मान्यता देण्यात आली. <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती ठराव क्र. 11.4.17— नोंद घेण्यात आली. |
| | 165.3.2 आस्थापना | वास्तुकला,विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी Senior Academic Consultant म्हणून डॉ.सुर्यकांत तुळशीराम पाटील यांची करारावर नेमणूक करण्याची बाब विचारार्थ <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव:** वास्तुकला,विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी Senior Academic Consultant म्हणून डॉ.सुर्यकांत तुळशीराम पाटील यांची करारावर नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव मागे घेण्यात आला ,त्यामुळे त्यास मान्यता देण्यात आली नाही. |
| | 165.3.3 आस्थापना | आरोग्य विज्ञान विद्याशाखेसाठीAssociate Consultant (Academic) म्हणून डॉ.उदय शिवदास महाजन यांची करारावरील नेमणूक मा.कुलगुरू यानी केली आहे. सदरील बाब कार्योत्तर मान्यतेसाठी सादर <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव:** आरोग्य विज्ञान विद्याशाखेसाठी Associate Consultant (Academic) म्हणून डॉ.उदय शिवदास महाजन यांची करारावरील नेमणूक मा.कुलगुरू यानी केली आहे. सदरील नेमणूकीस व्यवस्थापन मंडळाच्या वतीने कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 165.3.4 आस्थापना | विभागीय संचालक पदासाठी मुलाखत दि. 4.10.2017रोजी करण्यात आली होती.निवड समिती शिफारशींना मा.कुलगुरू यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने दि.14.12.2017 रोजी मान्यता दिलेली आहे.त्यानुसारडॉ.धनंजय माने यांची नेमणूक विभागीय संचालक,विभागीय केंद्र,नाशिक येथे नियुक्ती करण्यात आली. सदरील बाब व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर <br> **व्यवस्थापन मंडळ ठराव:** मुलाखत दि. 4.10.2017रोजी करण्यात आली होती.निवड समिती |

| | | |
|---|---|---|
| | | शिफारशींना मा.कुलगुरू यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने दि.14.12.2017 रोजी मान्यता दिलेली आहे.त्यानुसारडॉ.धनंजय माने यांची नेमणूक विभागीय संचालक,विभागीय केंद्र,नाशिक येथे नियुक्ती करण्यात आली. सदरील नेमणूकीस व्यवस्थापन मंडळाच्या वतीने कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 165.3.5 आस्थापना | दि.6 डिसेंबर 2017 रोजी गठीत केलेल्या "अ" व "ब" गटाच्या खातेअंतर्गत पदोन्नती समितीचे इतिवृत्त व त्यानुसार केलेली कार्यवाही व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव:** .6 डिसेंबर 2017 रोजी गठीत केलेल्या "अ" व "ब" गटाच्या खातेअंतर्गत पदोन्नती समितीचे इतिवृत्त व त्यानुसार पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीस व्यवस्थापन मंडळाच्या वतीने कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 165.3.6 विधी कक्ष | श्री. मुरलीधर लिंबाजी मापारी यांची बी.एड.शिक्षणक्रमाच्या प्रवेशाबाबत मा. उच्च न्यायालय,मुंबई (औरंगाबाद खंडपीठ) याच्या आदेशानुसार विद्यापीठाने स्थापन केलेल्या चौकशी समिती अहवाल व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव:** . श्री. मुरलीधर लिंबाजी मापारी यांची बी.एड.शिक्षणक्रमाच्या प्रवेशाबाबत मा. उच्च न्यायालय,मुंबई (औरंगाबाद खंडपीठ) याच्या आदेशानुसार विद्यापीठाने स्थापन केलेल्या चौकशी समिती अहवाल विद्यापीठाच्या परीक्षा मंडळापुढे ठेवण्यात येऊन याबाबत योग्य तो निर्णय घेऊन सदरील विषय पुढील व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीस ठेवावा. |
| | 165.3.7 | डॉ.प्रकाश अतकरे यांच्या संदर्भात वृत्तपत्रातील बातम्यांबाबत विद्यापीठाने स्थापन केलेल्या सत्यशोधन समितीचा अहवाल<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव:** डॉ.प्रकाश अतकरे यांच्या संदर्भात वृत्तपत्रातील बातम्यांबाबत विद्यापीठाने स्थापन केलेल्या सत्यशोधन समितीत -<br>१) डॉ.नंदनवार डी.आर, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे – अध्यक्ष<br>२) प्रा.डॉ.प्रमोद रसाळ सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय,पुणे -सदस्य<br>३) डॉ.एस.पी.पाटील,सेवानिवृत्त प्राध्यापक, मृदुशास्त्र व रसायनशास्त्र कृषी महविद्यालय,धुळे या सदस्यांचा समावेश करण्यात आला. सत्यशोधन समितीच्या खालील निष्कर्षानुसार -<br>१) डॉ.प्रकाश अतकरे यांची प्रपाठक या पदावर नेमणूक करतांना शैक्षणिक अर्हता मुक्त विद्यापीठाने ग्राह्य धरल्यामुळे पुढील सर्व पदे व आर्थिक फायदे हे विद्यापीठ कायदा व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या त्या त्या वेळच्या प्रचलित नियमानुसार मिळालेले आहेत.<br>२) डॉ. अतकरे यांनी B.Sc.(Agri),M.Sc.(Agri) जवाहरलाल नेहरु कृषी विश्वविद्यालय, जबलपूर (मध्यप्रदेश) येथून पदव्या प्राप्त केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे डॉ.अतकरे यांनी त्यांची Ph.D.पदवी 'Applied Economics' या विषयात वाणिज्य शाखेत राणी दुर्गावती विश्वविद्यालय,जबलपूर (मध्यप्रदेश) येथून प्राप्त केलेली आहे<br>३) डॉ.अतकरे यांचा Ph.D.संशोधनाचा विषय "Nature and role of risk and uncertainly in paddy-wheat based farming system of Madhya Pradesh" हा संपूर्णपणे कृषी विषयाशी संबंधित आहे.त्यांचे संशोधन मार्गदर्शक डॉ.बी.एल.मिश्रा हे सुध्दा कृषी विषयातले तज्ज्ञ असून त्यांची शैक्षणिक अर्हता M.Sc.(Agri)(Econ),Ph.D.(IARI,IIinois-USA)अशी आहे.डॉ.अतकरे यांची Ph.D.पदवी 'Applied Economics' या विषयातील असली तरीसुध्दा 'Applied Economics' या विषयात कृषी विषयाचा समावेश होतो.<br>४) डॉ.प्रकाश अतकरे यांच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अनेक समित्यांवर झालेल्या नेमणूका,विविध पदांवर झालेल्या नियुक्त्य, पदोन्नत्या या विद्यापीठ कायदा व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या त्या त्या वेळी प्रचलित असलेल्या अर्हतेनुसार झालेल्या आहेत असे समितीचे स्पष्ट मत आहे.<br>विद्यापीठाने स्थापन केलेल्या सत्यशोधन समितीच्या अहवालास मान्यता देण्यात आली |

| | | |
|---|---|---|
| | 165.3.8 आस्थापना | उपकुलसचिव तसेच सहा.कुलसचिव निवड समिती अहवाल – दि. 7 मार्च 2018 रोजी रिक्त पदांवरील पदोन्नतीसाठी विद्यापीठाच्या परिनियमानुसार खातेअंतर्गत पदोन्नती समितीचा अहवाल कार्योत्तर मान्यतेसाठी सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव:** दि. 7 मार्च 2018 रोजी रिक्त पदांवरील पदोन्नतीसाठी विद्यापीठाच्या परिनियमानुसार,खातेअंतर्गत पदोन्नती समितीचा अहवालास,पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार,<br>१) श्री.उत्तम जाधव यांच्या सहायक कुलसचिव या पदावरून उपकुलसचिव या पदावर केलेल्या पदोन्नतीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.<br>२) तसेच श्रीमती तनुजा कुलकर्णी यांच्या कक्ष अधिकारी या पदावरुन सहायक कुलसचिव पदोन्नतीस<br>३) श्री.खडताळे जयंत यांचा दि. २.४.२०१४ पासून वाढविलेला एक वर्षाचा परिविक्षा कालावधी रद्द करून त्यांच्या नियुक्तीपासून दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी दि. १.४.२०१४ पासून संपुष्टात आणण्यास एक सदस्यीस समितीने केलेली शिफारस<br>वरील क्र. २ व ३ यांस मान्यता देण्यात आली. |
| | 165.3.9 | दि. 27 फेब्रुवारी 2018 रोजी आयोजित करण्यात आलेल्या मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाबाबत<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव:** दि. 27 फेब्रुवारी 2018 रोजी विद्यापीठ व शासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाबाबत नोंद घेण्यात आली तसेच रु. १५ लाख खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| 165.4.0 | | **मा.कुलगुरु, अध्यक्ष यांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 165.4.1 | **विद्यापीठाच्या विद्वत परिषद सदस्य नामनिर्देशनाबाबत.**-(टिप्पणी - विद्यापीठाच्या परिनियम क्र. 5(3 Of 1992 see sub section 3(iv) नुसार Not more than 3 directors of Centres/ Divisions other than Heads of the Schools of Studies to be nominated by the Board of Management on the recommendations of the Vice-Chancellor<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव-** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्वत परिषद सदस्य नियुक्ती, परिनियम क्र. 5(3 of 1992) 3 मधील (iv)नुसार, विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने, मा. कुलगुरु यांनी केलेल्या शिफारशीनुसार विद्यापीठाच्या विद्वत परिषदेवर<br>०१) संचालक,शैक्षणिक सेवा विभाग<br>०२) संचालक, विद्यार्थी सेवा विभाग यांची सदस्य म्हणून नेमणूकीस मान्यता देण्यात आली. |
| | 165.4.2 | **प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ प्रा.राम ताकवले यांना डि.लिट. ही सन्माननीय पदवी देण्याबाबत – व्यवस्थापन मंडळ बैठक क्र. 165 (अ) परिभ्रमणाद्वारे** By Circulation **दि.10 मार्च 2018 नुसार बैठकीचा वृत्तांत**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - व्यवस्थापन मंडळ सन्माननीय सदस्य यांना दि. 10 मार्च 2018 रोजी व्यवस्थापन मंडळ बैठक क्र. १६५(अ) परिभ्रमणाद्वारे By Circulation वरील विषयाचा E-Mail पाठविण्यात आला. त्यानुसार व्यवस्थापन मंडळ सद्यस्थितीतील एकूण ११ सदस्यांपैकी सहा सदस्यांनी पत्राद्वारे/फोनद्वारे संमती दिली आहे.<br>सदरील कार्यवृत्तास मान्यता देण्यात आली. |

[signature]

**सचिव,**
**व्यवस्थापन मंडळ परिषद**

[signature]

**अध्यक्ष,**
**व्यवस्थापन मंडळ परिषद**